२२५५

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी एतदर्थ
मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक हिभाप-१०८०/१३१-वीस,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ मे, १९८१.

संदर्भ : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिभाप-१९७६-२८, दिनांक १०-६-१९७६.

निर्णय : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिभाप-१९७६-२८, दिनांक १० जून १९७६ अन्वये शासकीय अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याविषयीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशाच्या संदर्भात वेळोवेळी शासनाकडे केलेल्या निरनिराळ्या सूचनांचा विचार करून पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

(१) माध्यमिक शालांत परीक्षा, हिंदी हा विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाच्या हिंदीच्या निम्न व उच्च श्रेणी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येत आहे व पर्यायाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक इमएम-१९६३-न, दिनांक १८ नोव्हेंबर १९६६ मधील आदेश या निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहेत.

(२) हिंदी भाषेच्या प्रचाराचे काम करणाऱ्या खाजगी संस्थांतर्फे डिसेंबर १९६६ नंतर आणि दिनांक २४ नोव्हेंबर १९७७ पूर्वीच्या कालावधीत घेतल्या गेलेल्या परीक्षांचा दर्जा, एतदर्थ मंडळाच्या निम्न व उच्चस्तर परीक्षांच्या समकक्ष मानला जाण्याच्या प्रश्नावर विचार करण्यात आला असून या कालावधीत खाजगी संस्थांमार्फत घेण्यात आलेल्या अशा परीक्षांना समकक्ष म्हणून मान्यता देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) त्याचप्रमाणे इतर खाजगी संस्थांमार्फत, तसेच इतर राज्यांच्या व केंद्र शासनाच्या इतर अभिकरणां (एजन्सी) मार्फत घेण्यात येणाऱ्या हिंदीच्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, त्यांना एतदर्थ मंडळाच्या हिंदीच्या समकक्ष परीक्षांतून सूट देण्यात यावी किंवा कसे याबाबत आता असा निर्णय घेण्यात आला आहे की, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कमीत कमी माध्यमिक शालांत परीक्षा हिंदी विषय घेऊन उत्तीर्ण होण्याची आवश्यकता हाच निकष लावावा. तसे नसल्यास, अशा कर्मचाऱ्यांनी एतदर्थ मंडळाचीच विहित परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

मुख्य संचालक
फाईल क्र. ..........
अनुक्रमांक ..........

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

र. दा. रणदिवे,
शासनाचे उप सचिव.

एच-३४०(३०००-६-८१)

कृ. मा. प.

प्रति

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (पत्राने),
महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र।२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
अध्यक्ष, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळ, पुणे,
सचिव, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळ, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, मुंबई,
आयुक्त, मुंबई कामगार कल्याण मंडळ, मुंबई,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांखालील इतर सर्व विभागाध्यक्ष
व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (याच बातीवर प्रसिद्धीपत्रक काढावे या
विनंतीसह),
निवड नस्ती ( २ प्रती ),